तार : "कृषिविद"

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)

जा.क्र.विद्या-६/ मान्यता / २५९४ / २००५,
प्रति,

दिनांक ८ /११/२००५

- 9 NOV 2005

श्री.वाघ बाळासाहेब देवराम,
उपाध्यक्ष,
कर्मवीर काकासाहेब वाघ एज्युकेशन सोसायटी, नाशिक,
हिराबाई हरिदास विद्यानगरी,अमृतधाम,
पंचवटी,नाशिक ४२२००३.

**विषय**:- विना अनुदानित तत्वावर कृषि व संलग्न पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता ..

**संदर्भ**:- या कार्यालयाचे जा.क्र.एसीडी.६ /मान्यता /२७८५/२००४, दि. २.१२.२००४ चे पत्र

महोदय,

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ कलम ३१ (११) मधील तरतुदीनुसार महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने दिनांक २.८.२००५ रोजी संपन्न झालेल्या सभेत आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००५-२००६ पासून कर्मवीर काकासाहेब वाघ एज्युकेशन सोसायटी, पंचवटी ,नाशिक येथे कृषि महाविद्यालय ,बी.एस.सी. (ॲग्री) हा चार वर्षे मुदतीचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रथम तीन वर्षासाठी तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता ९६ इतकी राहील. पुर्नमान्यतेसाठी तीन वर्षाची मुदत संपणेपुर्वी सहा महिने अगोदर विद्यापीठाकडे अर्ज करावा लागेल.

सदरील मान्यता शासन निर्णय क्रमांक (i) कृषिवि/२११०/सीआर-२०३ /२०-अे, दिनांक ८ जुलै १९९९, (ii) क्रमांक कृषिवि/२११०/सीआर-२०३/२०-अे,दिनांक १ जुलै, २००० व (iii) दिनांक ८ ऑगस्ट २००३ अन्वये आणि कृषि परिषदेने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वे व निकष यांचे अधीन राहून व त्यामधील निकषांची आपल्या संस्थेकडुन पूर्तता करण्याच्या अटीपर देण्यात येत आहे.

Agri college
Shri. Hire
14/11

आपल्या महाविद्यालयाचे पदवी अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापुर्वी बँक गॅरंटी इत्यादी अटींची पूर्तता न केल्यास मान्यता पुढे चालू ठेवण्याची प्रक्रिया स्थगित अथवा रद्द करण्याचे हक्क कार्यकारी परिषदेने राखुन ठेवले आहेत.

ही मान्यता खालील अटी/ शर्तीचे अधिन राहून देणेत येत आहे.

१. उपरोक्त पदवी अभ्यासक्रमाची भारतीय कृषि अनुसंधान परिषद,नवी दिल्ली यांचेकडुन मूल्यमापन (Accrediation ) करुन /मान्यता प्राप्त करुन घेण्यात यावी. याची संपूर्ण जबाबदारी आपल्या संस्थेची राहील.

२. आपण नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबींची व त्यांच्या वेतनाची संपूर्ण जबाबदारी आपल्या संस्थेची राहील. याबाबत विद्यापीठ कुठलीही जबाबदारी घेणार नाही.

सोबत खालील कागदपत्रे आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी जोडली आहे, तसेच संस्थेची माहिती नमुना फार्ममध्ये भरून विद्यापीठास पाठवावी.

१. अटी व शर्ती २. शासन निर्णय ३. अभ्यासक्रम ४. माहितीपत्रक

५. प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम पत्रिका 6) Students Discipline & Conduct Rules-2002 & Formation of Students Council.

आपला विश्वासू

28/10/07

कुलसचिव

सोबत :- वरील प्रमाणे

प्रतिलिपी माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि),मफुकृवि.राहुरी यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव
२. संचालक संशोधन / विस्तार शिक्षण / विद्यार्थी कल्याण , मफुकृवि.राहुरी
३. संचालक (शिक्षण) ,महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद ,१३२/ब,भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ४११००७.
४. सहयोगी अधिष्ठाता,कृषि महाविद्यालय,पुणे,धुळे,कोल्हापूर.
५. नियंत्रक,मफुकृवि.राहुरी २/- संबंधीत संस्थेमार्फत लेखा विषयक बाबींची पूर्तता करण्यात येते किंवा नाही याबाबतचा पाठपुरावा आपल्या शाखेमार्फत करण्यात यावा.

प्रतः मा.कुलगुरु / कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक ,मफुकृवि.राहुरी यांचे माहितीसाठी .